नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०९/०७/२०२५ (बुधवार)**

---

## पुरग्रस्त ठिकाणी आणि संपर्क तुटलेल्या गावाला मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांची भेट, वैदयकीय उपचाराची अत्यंत आवश्यकता असलेल्या २ बालकांना मदत

नागपूर जिल्ह्यात सतत पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण जिल्ह्यात रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. काल रात्री गोसीखुर्द धरणाचे सर्व ३३ दरवाजे उघडण्यात आल्यानंतर, उमरेड विभागात आज मोठ्या प्रमाणात पूर आला, ज्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला. उमरेड विभागातील तीन गावांमध्ये पाणी वाढतच राहिल्याने टेकेपार, आवरमारा आणि चिंचघाट येथे गंभीर पुरपरिस्थिती निर्माण झाली. सदर परीस्थीतींचा आढावा घेण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी सदर ठिकाणी भेट दिली. सर्व प्रथम आम नदीच्या पुलावरून पाणी वाहत असल्याने तेथील परिस्थीती बाबत पाहणी करून त्यानंतर संपर्क तुटलेले गाव टेकेपार येथे मा. पोलीस अधिक्षक हे स्वत: एन.डी.आर.एफ. (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल) पथका सोबत त्यांच्या बोटीने गेले. त्यावेळी मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या सह, श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमेरड, श्री अमित घाटगे, तहसीलदार, कुही हे सुध्दा एन.डी.आर.एफ च्या बोटी मध्ये टेकेपार येथे गेले. टेकेपार येथे जावुन मा. पोलीस अधिक्षक यांनी तेथील नागराकांशी सवांद साधुन त्यांच्या अडी–अडचणी जाणुन घेतल्या. गावातील दोन लहान मुलांना ताप आलेला होता. त्यांना वैदयकीय उपचारांची अत्यंत आवश्यकता होती. नमुद पथकाने टेकेपार गावातील श्री अविनाश गायकवाड, त्यांची पत्नी सौ भारती गायकवाड यांना त्यांच्या ८ महिन्यांच्या आजारी बाळासह आणि ६ वर्षाच्या मुलासह एन.डी.आर.एफ च्या बोटीने गावाच्या बाहेर काढले. वेलतूर पोलिसांनी नमुद कुटुंबाला उपचारासाठी रुग्णालयात पाठवल्याने त्यांना वेळीच मदत मिळाली.

तसेच सदरवेळी मा पोलीस अधिक्षक यांनी सदर गावातील लोकांना हालविण्यासाठी सुरक्षीत ठिकाणाची पाहणी केली. नमुद एन.डी.आर.एफ. पथकाचे नेतृत्व श्री कृपाल मुळे यांनी केले.











# नागपुर ग्रामीण जिल्हयातील पुर परिस्थीतीत पोलीसांनी केलेल्या उपाययोजना

नागपूर जिल्ह्यात सतत पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण जिल्ह्यात रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.त्यामुळे नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत बऱ्याच गावांचा संपर्क तुटला असुन या बाबत पोलीस दक्ष असुन त्यांनी तात्काळ सदर पुर परिस्थीतमध्ये खाली प्रमाणे उपाययोजना केल्या आहे.

**नागपुर उपविभाग** :— पुलांवरून पाणी गेल्याने बोरी पोलीस स्टेशन हद्दीतील सिंधी गाव आणि बेला पोलीस स्टेशन हद्दीतील कळमना, पौनी, सिंगोरी, चारगाव, बेसूर या गावांचा संपर्क तुटला आहे. पुलाकडे जाणाऱ्या मार्गावर बॅरीकेटींग करण्यात आली असुन सर्व गावातील पोलीस पाटील यांना सर्तक राहण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहे. रामा धरणाचे दरवाजे आज उघडले जातील.

**उमरेड उपविभाग :—** उमरेड उपविभागाअंतर्गत कुही ते पाचगाव रोड , कुही ते वाठोडा रोड तसेच चिखलापार पुलावरून पुराचे पाणी वाहत असल्याने पोलीसांनी त्या मार्गावर बॅरीकेटींग केली असुन सर्व गावातील पोलीस पाटील यांना सर्तक राहण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर पोलीस स्टेशन हद्दीतील पाटण सावंगी गावात पुर परिस्थीती मुळे ४ घरे रिकामी करण्यात पोलिसांनी मदत केली. श्री अनिल म्हस्के, सहा.पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांनी रायवाडी परिसरातही पाहणी केली आणि खापा येथील कन्हान नदीजवळील ग्रामस्थांना ताब्यात घेवुन सुरक्षीत ठिकाणी हलविण्यात आले. तसेच ज्या पुलांवरून पाणी वाहत आहे त्या पुलाकडे जाणाऱ्या मार्गावर बॅरीकेटींग करण्यात आली असुन सर्व गावातील पोलीस पाटील यांना सर्तक राहण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहे.

**रामटेक उपविभाग :—** पोलीस स्टेशन पारशिवनी हद्दीतील पुलांवरून पाणी गेल्याने कालभैरव पेठ ते भागेमाहेरी कालभैरव पेठ ते बिटोली ,कालभैरव ते पेठ, परसोडी हे रस्ते बंद आहे. तेथील लोक सुरक्षित असून पालसवली, चारगाव कडून रस्ता सुरू आहे. तसेच साकारला ते कुसुमधारा ,कुसुमधारा ते पेंढरी ,दिघलवाडी ते पारशिवणी, नयाकुंड ते चिचभवण दरम्यान, निंबा ते पेंढरी दरम्यान, दिघलवाडी ते इडगाव दरम्यान,मेहंदी ते बखारी दरम्यान पुलावरून पाणी जात असल्याने रोड बंद आहे.पोलीस स्टेशन अरोली हद्दीमध्ये मौजा धनोली ते कोदामेंढी ते महालगाव ते तांडा पुलाचा काही भाग कोसळला असुन ठिकाणी बॅरिकेट्स लावुन रस्ता बंद

करण्यात आलेले आहे. बार्शी ते निमखेडा,खापरखेडा ते पार्डिकला शिरसोली ते तांडा. कोदमेंढी. ते बोरिघिवारी, अरोली ते दुधाला कॅनाल ची भिंत कोसळलेली आहे. तेथे सुध्दा बॅरिकेट लावण्यात आले आहे. नाल्याच्या रोडवरील पुलावरून पाणी जात असून सदर रस्ता हा बंद करण्यात आला आहे. नमुद गावातील लोकं सुरक्षीत असुन सर्व गावातील पोलीस पाटील यांना सर्तक राहण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहे.

**कन्हान उपविभाग :—** आजनगाव ते तेलीमांगली या रोडवरील नाल्यावरून पाणी वाहत असल्याने सदर रस्ता बॅरिकेट्स लावुन रस्ता बंद करण्यात आलेले आहे. तारसा येथील पुलावरून पाणी वाहत आहे, पोलीस स्टेशन कन्हान हद्दीतील गोंडेगाव येथील १५ घरांमध्ये पाणी शिरल्यामुळे तेथील लोकांना पोलीसांनी सुरक्षीत ठिकाणी हलविण्यास मदत केली. कन्हान उपविभागत जिथे रोड किंवा पुलावरून पाणी वाहत असल्याने रस्ते बंद झाले तेथे पोलीसांनी बॅरिकेटींग करून रस्ते बंद केले आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल पो स्टे हद्दीत मसली ते दिग्रस बु. रोडवरील पुलावरून पाणी वाहत आहे. तसेच येरला — धोटे गावचे नाला वरून देखील पाणी वाहत असल्याने सदर ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना पुलावरून पाणी वाहत असल्याने कोणीही पुल ओलांडून जाऊ नये, अशा गावात पी.ए. सिस्टीम वरून सूचना देऊन रोडवर रोप बांधण्यात आले. तसेच पोलिस पाटील यांना सतर्क राहण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

**वरील प्रमाणे पुरपरिस्थीत असुन नमुद ठिकाण बंदोबस्त लावण्यात आला आहे.तसेच सुचना फलक लावण्यात आले.**


पुलावरून पाणी वाहत
असताना पुल ओलांडु नये.






vivo V50 | ZEISS
23mm f/1.88 1/452s ISO125
07/09/2025, 11:36







## नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पुरात वाहुन गेलेल्या इसमांबाबत माहीती

१) पो स्टे सावनेर हद्दीत आज दि ०९/०७/२०२५ रोजी सकाळी ०७.३० वा दरम्यानं इसम नामे अनिल हनुमंत पानपत्ते, वय ३५ वर्ष,रा. बोरगाव बुजुर्ग तह कळमेश्वर हा गावाशेजारील नाल्याच्या पाण्यात वाहून गेला. त्याचा शोध सुरु आहे.

२) पो स्टे कळमेश्वर हद्दीत नामे कार्तिक शिवशंकर लाडसे, वय १८ वर्ष, रा. उप्पलवाडी नागपूर हा आज दि ०९/०७/२०२५ चे सकाळी ४.०० वा चे सुमारास बोरगाव उगले या गावाजवळील नाल्याच्या पाण्यात वाहून गेला होता त्याचा मृतदेह मिळून आला आहे.

## अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध

## अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन केळवद येथे दिनांक १५/१०/२०२४ रोजी अप क्र ५५६/२०२४ कलम १३७(२),१४३ भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलीचा आणि संशयीत आरोपी नामे गोपीचंद आसुटकर,रा तिष्टी बु. ता सावनेर जि नागपुर याचा शोध लागत नव्हता. नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी आणि आरोपीचा शोध घेण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांचे कडे वर्ग करण्यात आला. श्री मिलींद तायडे, प्रभारी अधिकारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात पोउपनि श्री मंगेश वानखेडे,मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे त्यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला असता दिनांक ०९/०७/२०२५ रोजी गोपनिय माहीतीच्या माहीती मिळाली की, नमुद गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलीचा आणि संशयीत आरोपी नामे गोपीचंद आसुटकर,वय २९ वर्षे, रा तिष्टी बु. ता सावनेर जि नागपुर हे वाडी जि. नागपुर येथे आहे. नमुद अपहृत

मुलगी आणि आरोपी यांना ताब्यात घेवुन पुढील तपास कामी केळवद पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## पोलीस स्टेशन कोंढाळी मर्ग क्रं २५/२०२५

**पोलीस स्टेशन कोंढाळी :—** पोलीस स्टेशन कोंढाळी येथे मर्ग क्र २५/२०२५ नोंद असुन यातील मृतक प्रमीला प्रभाकर मोदी, वय ९० वर्ष, रा.बाजारगाव, ता. हिंगणा, जि. नागपुर या दिनांक ०८/०७/२०२५ रोजी सकाळी ०६:०० ते ०७:०० वाजेच्या सुमारास मौजा गांवडेच्या तलाव, बाजारगाव येथे निर्माल्य टाकण्याकरीता गेल्या असता पाय घसरूण ती गावंडे तलावात पडुन पाण्यात बुडुन मरण पावली.

**सदर प्रकरणी पोलीस स्टेशन कोंढाळी येथे अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**